शुक्रवार दि. १९ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

### कुणबी जात प्रमाणपत्रासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन कक्ष स्थापन

# कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेला मिळणार गती

*मराठा समाजातील नागरिकांना प्रमाणपत्र, पडताळणी व ऑनलाइन नोंदींसाठी मार्गदर्शन*

**जालना - प्रतिनिधी**

मराठा समाजातील नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र तसेच ऑनलाइन कुणबी नोंदी शोधण्यासंबंधी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे विशेष हेल्पलाईन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यासंदर्भात आदेश जारी केले असून नागरिकांना सुलभ व जलद सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या ७ सप्टेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयासह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरावर आवश्यक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

**कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेला गती**

राज्य शासनाने मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी या जात प्रमाणपत्रांच्या निर्गमनासाठी मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यपद्धती निश्चित केली आहे. या प्रक्रियेमध्ये पात्र लाभार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळावे आणि अर्जांची प्रलंबितता कमी व्हावी यासाठी प्रशासनाने विविध स्तरांवर यंत्रणा उभी केली आहे.

गावपातळीवर ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या समित्यांची स्थापना करण्यात आली असून अर्जदारांच्या नोंदी, वास्तव्य, कुटुंबीयांची माहिती आणि इतर कागदपत्रांची पडताळणी या समित्यांमार्फत केली जाणार आहे.

**जमीन मालकीचा पुरावा नसल्यास प्रतिज्ञापत्राचा पर्याय**

आदेशानुसार, मराठा समाजातील भूपुत्र, भूमिहीन, शेतमजूर अथवा वडिलोपार्जित शेती करणाऱ्या व्यक्तींकडे जमीन मालकीचे दस्तऐवजी पुरावे उपलब्ध नसल्यास त्यांना दिलासा देणारी तरतूद करण्यात आली आहे.

अशा अर्जदारांनी १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वी किंवा त्यानंतर संबंधित परिसरात वास्तव्यास असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून स्थानिक चौकशी करण्यात येईल. तसेच संबंधित व्यक्तीच्या गावातील किंवा कुळातील नातेवाईकांना यापूर्वी कुणबी जात प्रमाणपत्र मिळाले असल्यास त्याचीही पडताळणी करण्यात येणार आहे. प्रशासनाकडून आवश्यकतेनुसार स्थानिक समिती तसेच वंशावळ समितीच्या माध्यमातून तपासणी करून अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**हेल्पलाईन कक्षातून मिळणार विविध सेवा**

जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आलेल्या हेल्पलाईन कक्षामार्फत नागरिकांना कुणबी नोंदी शोधणे, ऑनलाइन पोर्टलचा वापर, अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रांची माहिती, जात प्रमाणपत्रासाठी अर्ज प्रक्रिया, जात पडताळणीसाठी (पान २ वर)

### औरंगाबाद - जालना स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद निवडणूक:

## जालना जिल्ह्यात उत्साहात मतदान; दुपारी ४ वाजेपर्यंत ९९.५७% मतदानाची नोंद, निकालाकडे लक्ष

**जालना - प्रतिनिधी**

औरंगाबाद - जालना स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद निवडणुकीसाठी आज जालना जिल्ह्यात अत्यंत चुरशीने आणि शांततेत मतदान पार पडले. जिल्ह्यातील एकूण ४ मतदान केंद्रांवर सकाळी ८.०० वाजल्यापासूनच लोकप्रतिनिधी मतदारांनी मतदानासाठी उत्साह दाखवला. दिवसभरात वेळोवेळी मतदानाचा टक्का वाढत गेला आणि दुपारी ४.०० वाजेपर्यंत जिल्ह्यातील एकूण २३८ मतदारांपैकी तब्बल २३७ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये केवळ एका पुरुष मतदाराशिवाय उर्वरित सर्व स्त्री आणि पुरुष मतदारांनी मतदान केले असून, जिल्ह्याची एकूण अंतिम मतदानाची टक्केवारी ९९.५७% इतकी नोंदवली गेली आहे.

**महिला मतदारांचे शंभर टक्के मतदान**

या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे जिल्ह्यातील महिला मतदारांनी मतदानात दाखवलेली शंभर टक्के जागरूकता होय. जिल्ह्यात एकूण ११८ महिला मतदार होत्या आणि या सर्व ११८ महिला मतदारांनी (१००%) आपले मत नोंदवले. दुसरीकडे, एकूण १२० पुरुष मतदारांपैकी ११९ पुरुष मतदारांनी मतदान केले असून पुरुषांच्या मतदानाचा टक्का ९९.१६% राहिला. भोकरदन केंद्रावरील एका पुरुष मतदाराने मतदान न केल्यामुळे जिल्ह्याचे मतदान अवघ्या काही टक्क्यांनी १०० टक्क्यांपासून दूर राहिले.

**सकाळच्या सत्रात संथ सुरुवात, दुपारी वाढला वेग**

मतदानाच्या वेळ निहाय प्रक्रियेचा आढावा घेतला असता, सकाळी ८.०० ते १०.०० या पहिल्या दोन तासांत मतदानाचा वेग अत्यंत संथ होता. या सुरुवातीच्या काळात भोकरदन केंद्रावर ५ पुरुष आणि ३ महिला अशा एकूण ८ मतदारांनी, तर जालना केंद्रावर ८ पुरुष आणि ७ महिला अशा एकूण १५ मतदारांनी मतदान केले होते. परतूर केंद्रावर या काळात केवळ एका महिला मतदाराने मतदानाचा हक्क बजावला होता, तर अंबड केंद्रावर पहिल्या दोन तासांत एकाही मताची नोंद झाली नव्हती. त्यामुळे सकाळी १०.०० वाजेपर्यंत जिल्ह्यात केवळ २४ मतदारांनी (१३ पुरुष आणि ११ महिला) मतदान केले होते. त्यानंतर सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत मतदानाचा वेग थोडा वाढला. दुपारपर्यंत भोकरदन केंद्रावर एकूण (पान २ वर)

# औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ विधान परिषद निवडणूक २०२६

### निवडणूक निरीक्षक डॉ. संजय जी. कोलते यांची मतदान केंद्राना भेट व आढावा बैठक

**जालना - प्रतिनिधी**

औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ विधान परिषद निवडणूक २०२६ च्या कार्यक्रमानुसार आज दि. १८ जून, २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षक डॉ. संजय जी. कोलते, (भाप्रसे), आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे यांनी जालना जिल्ह्यास भेट दिली.



या भेटी दरम्यान निवडणूक निरीक्षक डॉ. कोलते यांनी आज सकाळी तहसील कार्यालय, भोकरदन येथील तसेच दुपारी तहसील कार्यालय, जालना येथील मतदान केंद्रांना भेट देवून मतदान व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रावरील आवश्यक सुविधा, मतदान कक्षाची रचना, मतदारांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी-सुविधा तसेच सुरक्षा व्यवस्थेची तपासणी केली. मतदान केंद्रावरील व्यवस्था समाधानकारक असून, मतदान प्रक्रियेची तयारी उत्तम असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे मतदान प्रक्रियेबाबत आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शशिकांत हदगल, आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुकेशिनी कांबळे-पगारे (पान २ वर)

# सीईओ घेणार शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा तालुकानिहाय आढावा

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा तसेच आगामी काळातील अंमलबजावणीबाबत आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरीया तालुकानिहाय आढावा बैठका घेणार आहेत.या बैठकींचे आयोजन संबंधित पंचायत समिती कार्यालयांमध्ये करण्यात आले असून विविध विभागांच्या प्रमुखांची उपस्थिती राहणार आहे. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, स्वच्छ भारत मिशन, उमेद अभियान, जल जीवन मिशन, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, कृषी विभाग, मनरेगा आदी योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

तसेच गावांतील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विविध उपक्रम व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन करण्यात येणार आहे.

**आढावा बैठकींचे वेळापत्रक**

दि. २३ जून : सकाळी ११ वाजता मंठा, दुपारी २ वाजता परतूर दि. २५ जून : अंबड व घनसावंगी

दि. ३० जून : भोकरदन व जाफ्राबाद दि. ३ जुलै : जालना व बदनापूर सर्व बैठका संबंधित पंचायत समिती कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात आल्या असून तालुकास्तरावरील सर्व विभाग प्रमुख , सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी आवश्यक माहितीसह उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



मंगळवार व शुक्रवार हे जिल्हास्तरावरील भेटीचे दिवस असल्याने संबंधित तालुक्यातील आढावा बैठक संपल्यानंतर नागरिकांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेता येणार आहे. तसेच जिल्हा स्तरावर दुसऱ्या दिवशीही नागरिकांना भेटण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

**डॉ. कृष्णकांत कनवरीया**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद जालना**

# जिल्हा रुग्णालयात कर्करोगाची पहिलीच अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वी !

### मॅलिग्नंट फायलॉइड्स ट्यूमरवर यशस्वी उपचार

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा सामान्य रुग्णालय आणि नवनवीन तंत्रज्ञानाची कास धरत असलेल्या येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त प्रयत्नांना मोठे यश आले आहे. रुग्णालयाच्या इतिहासात प्रथमच स्तनांच्या कर्करोगाची अत्यंत प्रगत आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या ऐतिहासिक टप्प्यामुळे जालना जिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य सेवेच्या शिरपेचात



मानाचा तुरा रोवला गेला आहे.

जिल्हा रुग्णालयातील नामवंत ऑन्को-सर्जन (कर्करोग तज्ज्ञ) डॉ. अब्दुल राफे आणि त्यांच्या वैद्यकीय टिमने एका महिला रुग्णावर अत्यंत दुर्मिळ अशा मॅलिग्नंट फायलॉइड्स ट्यूमर साठीची मॉडिफाइड रॅडिकल मॅस्टेक्टॉमी ही अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

**खासगी रुग्णालयांच्या आर्थिक लुटीतून सुटका!**

यापूर्वी जालना जिल्ह्यातील सामान्य आणि गरीब रुग्णांना स्तनांच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर किंवा इतर मोठ्या शहरांमधील खासगी रुग्णालयांचा आसरा घ्यावा लागत असे. यासाठी रुग्णांना लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याने मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. मात्र, आता जिल्हा रुग्णालयातच ही प्रगत शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यामुळे स्थानिक पातळीवरच गरिबांना मोफत आणि तज्ज्ञ उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**रुग्णालयाची पायाभूत सुविधा सक्षम**

जिल्हा सामान्य रुग्णालयाची पायाभूत सुविधा आणि आमचे मनुष्यबळ कर्करोगासारख्या (पान २ वर)

# 'एन निनो' च्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे

### आयुक्त पशसंवर्धन डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या एल निनोच्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धनविभागाच्यावतीनेपशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे.भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी (पान २ वर)

# जेईएफतर्फे एकल पालकांच्या पाचशे मुलांना रविवारी शैक्षणिक साहित्य वाटप समारंभ

**जालना - प्रतिनिधी**

जालना एज्युकेशन फाउंडेशनतर्फे रविवार दि. २१ जून रोजी सकाळी ११ वाजता लोकसहभागातून जालना जिल्ह्यातील एकल पालकांच्या पाचशे मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप समारंभ आयोजित करण्यात आला आहे.



कॉलेज रोडवरील महाराजा अग्रसेन फाउंडेशनमध्ये आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक घनश्यामदास गोयल हे राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र शासनाच्या एकल पालक मसुदा समितीचे सदस्य, शिक्षणतज्ज्ञ, लेखक व सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास आयुक्तालयाचे (पुणे) सहाय्यक आयुक्त योगेश जवादे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत (पान २ वर)

### परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलवरील वाद तीव्र

# देशविघातक सादरीकरणाचा आरोप करत कारवाईची मागणी

### वार्षिक स्नेहसंमेलनातील व्हिडिओ व्हायरल; सकल हिंदू समाजाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कथितपणे देशविघातक आणि दहशतवादाचे समर्थन करणारे सादरीकरण करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित शाळेचे संचालक, प्राचार्य, शिक्षक आणि जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील एक व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर जिल्ह्यात मोठी चर्चा सुरू झाली असून



या घटनेची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

निवेदनानुसार, किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमादरम्यान काही विद्यार्थिनींनी हातात तलवारी घेऊन तसेच विशिष्ट इस्लामिक पोशाख परिधान करून एका गाण्यावर नृत्य सादर केले. या गाण्यातील शब्द देशविघातक स्वरूपाचे (पान २ वर)

## छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या धर्मांतरितांच्या 'शुद्धीकरणा'स ३५० वर्षे पूर्ण!

# १९ जून हा 'राष्ट्रीय घरवापसी दिन' म्हणून साजरा करा!

### हिंदु जनजागृती समितीचे सर्व हिंदु संघटनांना आवाहन

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक योद्धे नव्हते, तर ते एक महान धर्मरक्षक आणि द्रष्टे युगपुरुष होते. आजपासून बरोबर ३५० वर्षांपूर्वी म्हणजेच १९ जून १६७६ या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी पराक्रमी सेनापती नेताजी पालकर यांचे 'शुद्धीकरण' करून त्यांना पुन्हा हिंदु धर्मात सन्मानाने प्रवेश दिला होता. या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घटनेला १९ जून २०२६ रोजी तब्बल ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक त्रिशताब्दी सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हा दिवस देशभरात राष्ट्रीय घरवापसी दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीने सर्व हिंदु संघटनांना केले आहे.

स्वराज्याचे पहिले सेनापती नेताजी पालकर यांना मुघलांनी कपटाने कैदेत टाकले होते. अत्यंत हालअपेष्टा करून त्यांना बळजबरीने मुसलमान बनवण्यात आले आणि त्यांचे नाव मुहम्मद कुली खान असे ठेवण्यात आले. अनेक वर्षे परधर्मात आणि परभूमीत राहूनही नेताजींचे मन स्वराज्यासाठी तळमळत होते. जेव्हा ते



मुघलांच्या तावडीतून सुटून पुन्हा रायगडावर छत्रपती शिवरायांच्या चरणी आले, तेव्हा महाराजांनी धर्मशास्त्रानुसार विधीवत त्यांचे शुद्धीकरण केले. जेधे शकावलीनुसार शके १५९८, आषाढ वद्य ४ (१९ जून १६७६) या दिवशी नेताजी पालकर यांना पुन्हा हिंदु धर्मात स्वीकारण्यात आले.

याविषयी बोलताना समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे म्हणाले की, आज ३५० वर्षांनंतरही हा इतिहास आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक आहे.

विविध आमिषे, दबाव किंवा छळवणुकीला बळी पडून आपले लाखो हिंदु बंधू-भगिनी धर्मांतरित झाले आहेत. आजच्या काळात लव्ह जिहादसारख्या सुनियोजित संकटाला बळी पडून आपल्या अनेक हिंदु युवती परधर्मात ओढल्या जात आहेत. 'ती गेली तर जाऊ द्या, आता तिचा व आमचा काही संबंध नाही', या मानसिकतेचा हिंदु समाजाने आता त्याग केला पाहिजे. प्रेमाच्या खोट्या जाळ्यात अडकवून फसवल्या गेलेल्या आपल्या मुलींना आणि बहिणींना पुन्हा सन्मानाने हिंदु धर्मात आणि समाजात सुरक्षित स्थान देण्यासाठी या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण करणे अत्यंत गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समस्त हिंदु समाज, संत आणि संघटनांनी पुढे येण्याची गरज आहे. जे बांधव आणि विशेषतः ज्या भगिनी मूळ प्रवाहात (हिंदु धर्मात) परत येऊ इच्छितात, त्यांच्यासाठी आपण आपले दरवाजे आणि मने खुली केली पाहिजेत.

**श्री. रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती**
**(संपर्क : ९९८७९ ६६६६६)**

---

## अडीच तासांच्या तांत्रिक कारणावरून विमा दावा फेटाळणे महागात पडले

**जालना । प्रतिनिधी**

केवळ अडीच तासांच्या तांत्रिक कारणावरून कोविड विमा दावा फेटाळणे विमा कंपनीला चांगलेच महागात पडले आहे. ग्राहक मंचाने विमा कंपनीचा निर्णय मनमानी, अवास्तव आणि कायद्याने न टिकणारा ठरवत ग्राहकाच्या बाजूने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालामुळे विमा कंपन्यांच्या धोरणांमधील अति-तांत्रिक बाबींवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पॉलिसीच्या मूळ उद्देशाला हरताळ फासणाऱ्या अशा कृतींना चाप बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात, रॉबिन ए. के. नावाच्या व्यक्तीने स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनीकडून कोरोना रक्षक पॉलिसी घेतली होती, ज्यामध्ये एक लाख रुपयांचे विमा संरक्षण होते. पॉलिसीच्या नियमांनुसार, कोविड-१९ चे निदान झाल्यास आणि किमान ७२ तास रुग्णालयात दाखल राहावे लागल्यास एकरकमी लाभ देण्याची तरतूद होती. दुर्दैवाने, तक्रारदाराला कोरोनाची लागण झाली आणि त्यांना १६ ऑक्टोबर २०२० रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले व १९ ऑक्टोबर २०२० रोजी डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, विमा कंपनीने त्यांचा दावा फेटाळला, कारण रुग्णालयात दाखल राहण्याचा कालावधी ७२ तासांपेक्षा सुमारे अडीच तासांनी कमी, म्हणजेच जवळपास ७० तास होता. या अन्यायकारक निर्णयाविरोधात तक्रारदाराने थ्रिसूर येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली. आयोगाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली.

## माणगाव दहिवलीत किसान गोष्टी कार्यक्रमात शेतकऱ्यांना यांत्रिक भात लागवडीचे धडे

**बोरघर । प्रतिनिधी**

बदलत्या हवामानात शेती परवडणारी करायची असेल आणि मजुरांच्या टंचाईवर मात करायची असेल तर यांत्रिकीकरणाशिवाय पर्याय नाही, असा सूर दहिवली येथे झालेल्या किसान गोष्टी कार्यक्रमात उमटला. तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने १०/६/२०२६ रोजी मौजे दहिवलीतील प्रगतशील शेतकरी श्री. दाऊद गालसुरकर यांच्या शेतावर हा खरीपपूर्व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आला.

**प्लास्टिक ट्रे नर्सरीचे थेट प्रात्यक्षिक**

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलं ते प्लास्टिक ट्रेवर भात रोपवाटिका तयार करण्याचं थेट प्रात्यक्षिक. प्रगतशील शेतकरी दाऊद गालसुरकर यांनी स्वतः चा अनुभव सांगताना ट्रे कसे भरायचे, बियाणे कसे पेरायचे, पाणी व्यवस्थापन कसे करायचे आणि यंत्राद्वारे लागवडीसाठी रोपे कशी तयार करायची हे शेतकऱ्यांना दाखवून दिलं. यांत्रिक भात लावणी यंत्रासाठी ट्रे पद्धत अत्यावश्यक आहे, हे प्रात्यक्षिकातून स्पष्ट झालं.

**कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी संशोधन केंद्र रेपोलीचे प्रभारी अधिकारी डॉ. निगडे उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी माणगाव श्री किरण पडवळकर यांनी यांत्रिकीकरणाचे फायदे विशद केले. शेतकऱ्यांना त्यांनी खरीप हंगामासाठी २ महत्त्वाच्या सूचना केल्या:

**बीज प्रक्रिया व उगवण क्षमता चाचणी**

: पेरणीपूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासा. बीजप्रक्रिया केल्याने रोग-कीडींचा प्रादुर्भाव कमी होऊन उत्पादन वाढतं. एल निनोचा सामना: यंदा एल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. कृषी विभागाने दिलेल्या उपाययोजना, कमी पाण्यात येणाऱ्या वाणांची निवड आणि पाणी बचतीच्या तंत्रांचा अवलंब करा.





**नैसर्गिक शेतीकडे कल**

सहाय्य तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा श्री प्रमोद शिंदे यांनी खेत बचाव अभियान समजावून सांगितलं. जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक निविष्ठा वापराव्यात, असं आवाहन केलं. यावेळी गोकृपा अमृतम या नैसर्गिक निविष्ठेची माहिती देऊन प्रत्यक्ष वापरही दाखवण्यात आला.

सहाय्यक कृषी अधिकारी श्रीम. प्रतिभा खिल्लारी यांनी कृषी विभागाच्या फळबाग लागवड योजना, कृषी यांत्रिकीकरणावरील अनुदान योजना यांची सविस्तर माहिती दिली. अनुदान कसे मिळवायचे, अर्ज कुठे करायचे याबत शंका निरसन केलं.

**शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

या शिबिराला मंडळ कृषी अधिकारी गोरेगाव श्री एस बी ससाने, सर्व सहाय्यक कृषी अधिकारी, परिसरातील प्रगतशील शेतकरी, चे संचालक, शेतकरी गटांचे सभासद आणि दहिवली परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने हजर होते. चर्चा सत्रात शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरण, एल निनो आणि नैसर्गिक शेतीबाबत प्रश्न विचारून शंका दूर करून घेतल्या. कृषी विभागाने विश्वास व्यक्त केला की या उपक्रमामुळे माणगाव तालुक्यात यांत्रिक भात लावणीला मोठी गती मिळेल आणि मजुरांवरील अवलंबित्व कमी होईल.

---

## परतूर लायन्स क्लबचा ११ वा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

### "अध्यक्षपदी महेश होलानी, सचिवपदी कैलास तांगडे तर कोषाध्यक्षपदी नरपत जांगीड यांची निवड"

**परतूर - प्रतिनिधी**

शहरातील मुंदडा फंक्शन हॉलमध्ये परतूर लायन्स क्लबचा ११ वा दिमाखदार पदग्रहण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात क्लबच्या आगामी वर्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे महेश होलानी यांच्याकडे, सचिवपदाची सूत्रे कैलास तांगडे आणि कोषाध्यक्षपदाची सूत्रे नरपत जांगीड यांच्याकडे अधिकृतपणे सोपविण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी इन्स्टॉलेशन ऑफिसर म्हणून सेकंड सेंचुरी ॲम्बेसिडर व माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन दिलीप मोदी उपस्थित होते. तर नवीन सदस्यांना शपथ देण्यासाठी इंडक्शन ऑफिसर म्हणून रिजन चेअरपर्सन लायन जयश्री लड्डा यांनी भूमिका बजावली.

नूतन कार्यकारिणी व पदाधिकारी या सोहळ्यात केवळ मुख्य त्रिमूर्तीच नव्हे, तर क्लबच्या इतर महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनीही शपथ घेतली

उपाध्यक्ष: राहुल सातोंनकर टेमर: संतोष शिंदे टेलर ट्विस्टर: तुकाराम उबाळे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स: डॉ. सकलेचा, डॉ. नंद, डॉ. कदम, बबनराव उन्मुखे आणि डॉ. संदीप चव्हाण. हे आहेत आगामी वर्षातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प: पदभार




स्वीकारल्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष महेश होलानी यांनी आपल्या आगामी वर्षाच्या लोककल्याणकारी संकल्पांची घोषणा केली. यात प्रामुख्याने खालील प्रकल्पांचा समावेश आहे: नेत्रदान संकल्प: १,००० नागरिकांकडून मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प अर्ज भरून घेणे. स्वच्छता अभियान: परतूर शहरात दर रविवारी जेसीबीच्या साहाय्याने २ तास विशेष स्वच्छता मोहीम राबवणे. लॉयन्स क्वेस्ट: आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला सोशल व इमोशनल लर्निंग प्रकल्प शहरातील ३ शाळांमध्ये सुरू करणे. चिल्ड्रन्स प्ले पार्क: लहान मुलांसाठी परतूर शहरात लायन्स चिल्ड्रन्स प्ले पार्कची उभारणी करणे. मेडिकल बँक विस्तार: क्लबच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या मेडिकल इक्विपमेंट बँकेचा विस्तार करणे. (या प्रसंगी महेश होलानी यांनी स्वतःकडून एक ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन या बँकेला भेट दिली आहे. सदस्यांचे कौतुक: क्लबच्या १०० सदस्यांचा वाढदिवस व लग्नाचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करणे. 'सध्या क्लबतर्फे सुरू असलेल्या मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया, मोफत डायलिसिस, रुग्णांना मोफत भोजन, वृक्षारोपण हे उपक्रम यापुढेही अविरत आणि निर्विघ्नपणे सुरूच राहतील.''

महेश होलानी (नवनिर्वाचित अध्यक्ष) मान्यवरांची मनोगते: दिलीप मोदी (इन्स्टॉलेशन ऑफिसर): ''परतूर लायन्स क्लबला गौरवशाली इतिहास असून, सेवाभावी उपक्रमांची ही परंपरा नवीन पिढीही अशीच अविरत चालू ठेवेल.'' राहुल पारटकर (मुख्य वक्ते व शाखा अधिकारी, ): ''तालुका पातळीवर लायन्स क्लबचे काम कौतुकास्पद आहे. आगामी काळात एलआयसी आणि लायन्स क्लब मिळून संयुक्त उपक्रम राबवू.''

जयश्री लड्डा व रेवती राखे (रिजन/झोन चेअरपर्सन): यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत, क्लबच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन केले.

मान्यवरांची उपस्थिती: या दिमाखदार सोहळ्याला माजी अध्यक्ष छाया सोळंके, सचिव नीलिमा मसलकर, कोषाध्यक्ष रोहिणी बहिवाळ या मंचावर उपस्थित होत्या.

तसेच व्यापारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष दिलीप होलानी, अध्यक्ष राजेश मस्के, एकनाथ कदम, नगरसेवक गणेश नळगे, राजेंद्र पोरवाल, श्रीकिसनजी दरगड, सखारामजी मुंदडा, राजेंद्र दरगड, पापालाल भुतडा, रामेश्वर तापडिया, रवी मुंदडा, संस्थापक अध्यक्ष मनोहर खालापुरे, परेश पाटील, अशोक उबाळे, सुनील कासट, मधुकर भोसले, प्राचार्य टकले सर, ठाकर सर, संदीप जगताप, संजय जाधव यांच्यासह लायन्स नेत्रालयातील डॉक्टर्स आणि मोठ्या संख्येने लायन्स भगिनी व बांधव उपस्थित होते.

## जालना मनपा अतिक्रमण विभागाच्या कारवाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचे निवेदन



**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून संग्राम नगर येथे चहाच्या दुकानावर तोडफोड केल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदन वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष हरिष आंबादास रत्नपारखे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बस स्टँड रोड परिसरातील संग्राम नगर येथे शेख महेबूब शेख रशीद कुरेशी यांच्या चहाच्या दुकानावर कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता कारवाई करण्यात आली. तसेच संबंधित प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना आणि न्यायालयाने 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिलेले असतानाही दुकानाची तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, संबंधित दुकानधारकांनी मालमत्तेचा कर भरल्याच्या पावत्या देखील अधिकाऱ्यांना दाखविल्या होत्या. मात्र तरीही अतिक्रमण विभागाने कारवाई केल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच नुकसानग्रस्त दुकान मालकांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी शेख महेबूब शेख रशीद कुरेशी, इरफान कुरेशी, नदीम शेख, समीर शेख, आर्यन चौधरी आदींच्या स्वाक्षऱ्यांसह निवेदन सादर करण्यात आले.

---

# बालकामगाराच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला नवे वळण!

## मत्स्योदरी स्टील कंपनीसह पोलीस, कामगार व बाल संरक्षण यंत्रणांना बाल हक्क आयोगाची नोटीस

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा परिसरातील मत्स्योदरी स्टील कंपनीमध्ये काम करत असताना संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झालेल्या अल्पवयीन बालकामगाराच्या प्रकरणाची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात कंपनी व्यवस्थापन, पोलीस विभाग, कामगार विभाग, महिला व बालविकास विभाग, बाल कल्याण समिती आणि जिल्हा बाल संरक्षण यंत्रणांना नोटीस बजावत आयोगाला प्राप्त तक्रारीवरून नोटीस आणि न्यायिक सुनावणी जाहीर केली आहे. आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार, फेब्रुवारी २०२६ मध्ये मत्स्योदरी स्टील कंपनी येथे १३ वर्षे १० महिने वयाच्या अल्पवयीन मुलाचा संशयास्पद मृत्यू झाला होता. संबंधित मुलगा कायदेशीरदृष्ट्या काम करण्यासाठी पात्र नसतानाही त्याला धोकादायक स्वरूपाच्या कामावर ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेमुळे बालकामगार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीवर तसेच संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आयोगाच्या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे की, मृत्यूनंतर घटनेची वस्तुस्थिती लपविण्याचा प्रयत्न झाला असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आली आहे. तसेच काही शासकीय यंत्रणांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आयोगाने सर्व संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणीस हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आयोगाने मत्स्योदरी स्टील कंपनी व्यवस्थापनाला मृत मुलाच्या वयाचा अधिकृत पुरावा, कामगार हजेरी नोंदवही, वेतनपत्रक, कामावर ठेवण्यास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांची माहिती तसेच संबंधित रोजगार नोंदी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. आणि चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या तपास अधिकाऱ्यांना या प्रकरणातील प्रथम माहिती अहवाल (एफआयआर), घटनास्थळ पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, जप्त करण्यात आलेले सीसीटीव्ही फुटेज आणि तपासाचा अद्ययावत प्रगती अहवाल आयोगासमोर सादर करण्यास सांगण्यात आले आहे. जिल्हा कामगार अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी आणि बाल कल्याण समिती यांना घटनेनंतर त्यांनी कोणती कारवाई केली, बालकामगार कायद्याअंतर्गत कोणती पावले उचलली आणि जबाबदार व्यक्तींवर काय कारवाई करण्यात आली याचा सविस्तर अहवाल आयोगाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची अर्धन्यायिक सुनावणी २५ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी व पक्षकारांनी आवश्यक मूळ कागदपत्रांसह वैयक्तिकरित्या उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**अनुपस्थितीवर कायदेशीर कारवाईचा इशारा**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने स्पष्ट इशारा दिला आहे की, सुनावणीस अनुपस्थित राहणे किंवा मागविलेले अहवाल वेळेत सादर न करणे याकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जाईल. अशा परिस्थितीत बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ अंतर्गत प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येऊ शकते.

**बालकामगार प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

या प्रकरणामुळे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये अल्पवयीन मुलांकडून काम करून घेतले जाते का, बालकामगार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होते का आणि अशा घटनांमध्ये जबाबदारांवर कठोर कारवाई का होत नाही, हे प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. बालकामगाराच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी आता थेट महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या पातळीवर पोहोचल्याने या सुनावणीतून अनेक महत्त्वाच्या बाबी उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील नागरिक, सामाजिक संघटना आणि बालहक्क कार्यकर्त्यांचे लक्ष आता २५ जून रोजी होणाऱ्या सुनावणीकडे लागले आहे.

# परतूर येथील किड्स वर्ल्ड स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आक्षेपार्ह गाणे व घोषणा

## अध्यक्ष, शिक्षकांसह तिघांवर बीएनएस अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल!

**परतूर । प्रतिनिधी**

येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या हातात नकली तलवारी देऊन हिंसेचे उदात्तीकरण करणारे आक्षेपार्ह गाणे वाजवल्याप्रकरणी आणि भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या घोषणा दिल्याप्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी शाळेचे अध्यक्ष, शिक्षक आणि सूत्रसंचालिका अशा तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता () २०२३ च्या विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, या घटनेमुळे जालना जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलचे सन २०२५ चे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी नगर परिषद सांस्कृतिक सभागृह, परतूर येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना हातामध्ये नकली तलवारी देऊन एका गाण्यावर डान्स करण्यास लावण्यात आला होता. या डान्सदरम्यान ‘‘गुस्ताख-ए-नबी की एक ही सजा, सर तन से जुदा, सर तन से जुदा‘‘ हे आक्षेपार्ह आणि हिंसेला चिथावणी देणारे गाणे वारंवार वाजवण्यात आले. तसेच पार्श्वभूमीवर तुर्की येथील अर्तगुल गाझी मालिकेतील फोटोंसोबतच, पाकिस्तानी दहशतवादी मुमताज कादरी याचाही फोटो दाखवण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

**ट्विटर वर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर चौकशीचे आदेश**

हा संपूर्ण प्रकार झाल्यानंतर शाळेच्या प्रशासनाने हा व्हिडिओ त्यांच्या अधिकृत यूट्यूब चॅनलवर अपलोड केला होता. दिनांक १६ जून २०२६ रोजी हा व्हिडिओ आणि त्याबाबतची *(पान २ वर)*

**आमदार बबनराव लोणीकरांची आक्रमक भूमिका ; शैक्षणिक संस्थांमध्ये अशा प्रकारांना थारा नसावा लोणीकर**

या प्रकरणी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर अखेर परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांपासून या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते राज्य सरकारपर्यंत हा विषय पोहोचविला होता.

परतूर येथील शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनातील एका व्हिडिओची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाल्यानंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेतली. व्हिडिओतील दृश्ये, त्यामध्ये वापरण्यात आलेले कथित गाणे, विद्यार्थ्यांच्या हातातील नकली तलवारी आणि प्रदर्शित करण्यात आलेल्या काही छायाचित्रांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत आमदार बबनराव लोणीकर यांनी कठोर कारवाईची मागणी केली होती. १७ जून रोजी हा प्रकार निदर्शनास येताच आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्हाधिकारी असिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेजबीर सिंग संधू तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्णकांत कनवरिया यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. संबंधित व्हिडिओची सत्यता पडताळून दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. याचबरोबर आमदार बबनराव लोणीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना स्वतंत्र पत्र पाठवून या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालण्याची विनंती केली होती. राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्याही *(पान २ वर)*

# माहोरा केंद्रीय प्राथमिक शाळेत मोफत पुस्तकांचे वाटप

## पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीच्या वर्गात १३ विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीच्या वर्गात १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक अनिल गवई व केंद्र प्रमुख ज्ञानेश्वर सोनुने यांनी स्वागत करून इयत्ता १ ते ४ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या वेळी जाफ्राबादचे गटविकास अधिकारी लिबाजी बारगिरे, लेखा अधिकारी सतिश चंदनशिवे, सरपंच गजानन पा. लहाने यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, माहोरा येथे मराठी व इंग्रजी माध्यमातून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन जेष्ठ शिक्षिका अर्चना भांडेकर, सविता काळे, सुनिता बडगुजर, मधुकर इंगळे यांनी केले आहे.

याकार्यक्रमाला विलास पाटील लहाने, आसाराम पोपळे, सय्यद अहमद, दिनेश वाघमारे, संतोष गौरकर, बाळासाहेब गव्हले व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.





हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची मुंबई येथे निवासस्थानी भेट घेतली तसेच विद्यार्थी शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चर्चा करून निवेदन सादर केले.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत विभागस्तरीय तपासणी

## स्वच्छतेच्या कामात सातत्य ठेवण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्हास्तरावर पुरस्कार प्राप्त केलेल्या गावांनी स्वच्छतेच्या कामात सातत्य राखावे. स्वच्छतेच्या कामाला प्राधान्य देणारी गावे आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून उदयास येत असल्याचे प्रतिपादन विभागीय अप्पर आयुक्त (विकास) सुषमा देसाई यांनी केले. त्या बदनापूर तालुक्यातील वरुडी तसेच जालना तालुक्यातील सावरगाव (हडप) ग्रामपंचायतींच्या विभागस्तरीय तपासणी प्रसंगी बोलत होत्या. सन २०२५-२६ मधील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त वरुडी व द्वितीय क्रमांक प्राप्त सावरगाव (हडप) या ग्रामपंचायतींची पुरस्कारासाठी विभागस्तरीय तपासणी दिनांक १७ जून रोजी करण्यात आली. त्याअंतर्गत समितीने दोन्ही ग्रामपंचायतींची सविस्तर पाहणी केली. यावेळी अप्पर आयुक्त (विकास) सुषमा देसाई यांच्यासह समिती सदस्य संगीता डोल्हारकर व संतोष चप्पलवार यांनी गावांतील स्वच्छतेच्या विविध उपक्रमांची तपासणी केली. समितीने वैयक्तिक शौचालयांची उभारणी व वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पाणीपुरवठा व्यवस्था, शाळा व अंगणवाडी परिसरातील स्वच्छता, शालेय शौचालये, विद्यार्थ्यांमधील स्वच्छतेच्या सवयी, सार्वजनिक शौचालयांची स्थिती, पाण्याची गुणवत्ता तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी बाबींची पाहणी केली. तसेच महिलांना मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत देण्यात आलेले प्रशिक्षण, करपट्टी व घरपट्टी वसुली, पाणीपुरवठ्यासाठी करण्यात आलेल्या *(पान २ वर)*



# महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात

**दत्ता देशमुख**

जाफराबाद,येथे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती जाफराबाद येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. तर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विजयनाना परिहार, शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, नगरसेवक सुरेश दिवटे, माजी नगराध्यक्ष संजय लहाने, नायब तहसीलदार मिसाळ, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, नगराध्यक्ष दीपक वाकडे, दिलीपसिंह गौतम

**आदी मान्यवरांनी भाषण केले.**

कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयनाना परिहार यांनी अध्यक्षीय मनोगतात महाराणा प्रताप यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी सुरेश गवळी, सुधीर पाटील, नगरसेवक अनिल बोर्डे, रविराज जयस्वाल, रमेश धवलिया, भगवानसिंह इंगळे, प्रकाशराव मिरगे, मोहन मुळे, मुकेश भारद्वाज, प्रवीण बडजावत, दामू वैद्य, सुरेश वाकडे, रवि हिवाळे, संदीप वाकडे, संजयसिंह गौतम, किशोरसिंग बायस, दुर्गेशसिंग कच्छवा, मनोज बायस, मुजीब, बबनसिंग बायस, राजेंद्रसिंह गौतम, अमोल पडघन, ॲड. विष्णू शिंदे, गव्हाणे, ज्ञानेश्वर

शिंदे, गजबसिंग घुसिंगे, गजेंद्रसिंह कछवा, देविसिंग बायस, संजय खंडेलवाल, योगेश नगरिया, राजू ताटू, अर्जुन खंडेलवाल, कृष्णा दुनगहू, संतोषसिंह बायस, प्रकाश कछवा, मयूर बायस, इश्वर परिहार, सुभाष लोळगे, अनिल मुळे, केदार गौतम, विजय बिसेन, प्रमोद राजपूत, दीपक ठाकूर, बाला गौतम, गगन ठाकूर, सौगन बिसेन, कुलदीप बायस, आकाश कछवा, प्रणव गौतम, गोपाल ढाकीफळे, अनिरुद्ध मुळे, सचिन बायस, पंढरी परिहार, *(पान २ वर)*

# तुळशी पार्कमध्ये मध्यरात्री घरफोडीचा थरार

## कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरातील जुना जालना परिसरातील तुळशी पार्क येथे मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा मौल्यवान ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कदीम जालना पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तुळशी पार्क येथील रहिवासी विनोद विष्णू दळवी हे खासगी वित्तीय कंपनीत नोकरी करतात. त्यांच्या पत्नी भाग्यश्री विनोद दळवी या मुलासह माहेरी भोकरदन तालुक्यातील पळसखेडा येथे गेल्या होत्या. तर विनोद दळवी हे कामानिमित्त घराला कुलूप लावून बाहेर गेले होते.

दरम्यान, १६ जून रोजी पहाटे शेजारी राहणाऱ्या छाया लक्ष्मण विधाठे यांनी घराचे गेट आणि मुख्य दरवाजा उघडा असल्याचे पाहून भाग्यश्री दळवी यांना दूरध्वनीद्वारे माहिती दिली. त्यानंतर नगरसेवक सुजीतकुमार जोगस यांनी घटनास्थळी जाऊन घरातील कपाटे उघडी असल्याचे व्हिडिओ कॉलद्वारे कुटुंबीयांना दाखविले.

घरी परतल्यानंतर कपाटातील सोन्याचे नेकलेस, मिनी गंठण, झुंबर, विविध दागिने, चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरीला *(पान २ वर)*

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत ‘विकसित भारत की पहचान’ उपक्रमास प्रारंभ

## जालना येथे जनजागृती कार्यक्रम; कर्मचाऱ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ

**जालना - प्रतिनिधी**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली तसेच समाज कल्याण आयुक्तालय, पुणे आणि सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, जालना यांच्या वतीने ‘नशामुक्त भारत अभियान’ अंतर्गत ‘विकसित भारत की पहचान’ या विशेष जनजागृती उपक्रमास बुधवार दि.१७ रोजी प्रारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून समाजात व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून निरोगी व सुदृढ समाज घडविण्याचा संदेश देण्यात येत आहे.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नशामुक्तीची शपथ घेत अभियानाला सुरुवात केली. ‘विकसित भारत की पहचान’ या संकल्पनेवर आधारित हा विशेष जनजागृती सप्ताह १७ जून ते २६ जून, २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागृती केली जाणार आहे. या अभियानादरम्यान शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतिगृहे, संत भगवानबाबा उसतोड कामगारांच्या मुलामुलींचे शासकीय वसतिगृह तसेच महाविद्यालयांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा आणि विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसह युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त समाज कल्याण डॉ. अनिता राठोड, विशेष अधिकारी (शा.नि.शा.) स्नेहल मोवळे, समाज कल्याण निरीक्षक सुरेंद्र चितेकर, मुख्याध्यापक डॉ. दिलीप गिरी यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी अमंली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर होणाऱ्या *(पान २ वर)*

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत ‘विकसित भारत की पहचान’उपक्रमास प्रारंभ

## जालना येथे जनजागृती कार्यक्रम; कर्मचाऱ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ

**जालना -प्रतिनिधी**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली तसेच समाज कल्याण आयुक्तालय, पुणे आणि सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, जालना यांच्या वतीने ‘नशामुक्त भारत अभियान’ अंतर्गत ‘विकसित भारत की पहचान’ या विशेष जनजागृती उपक्रमास बुधवार दि.१७ रोजी प्रारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून समाजात व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून निरोगी व सुदृढ समाज घडविण्याचा संदेश देण्यात येत आहे.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नशामुक्तीची शपथ घेत अभियानाला सुरुवात केली. ‘विकसित भारत की पहचान’ या संकल्पनेवर आधारित हा विशेष जनजागृती सप्ताह १७ जून ते २६ जून, २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागृती केली जाणार आहे. या अभियानादरम्यान शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतिगृहे, संत भगवानबाबा उसतोड कामगारांच्या मुलामुलींचे शासकीय वसतिगृह तसेच महाविद्यालयांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा आणि विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसह युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त समाज कल्याण डॉ. अनिता राठोड, विशेष अधिकारी (शा.नि.शा.) स्नेहल मोवळे, समाज कल्याण निरीक्षक सुरेंद्र चितेकर, मुख्याध्यापक डॉ. दिलीप गिरी यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी अमंली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत माहिती दिली. व्यसनामुळे कुटुंब व्यवस्था *(पान २ वर)*

# एमएसएमई दिनानिमित्त वाशी येथे २७ जून रोजी शिखर परिषद व पुरस्कार वितरण सोहळा

## जालना जिल्ह्यातील पात्र उद्योजकांना सहभागी होण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक बँकेच्या मदतीने राबविण्यात येणाऱ्या ‘रॅम्प’ (Raising and Accelerating MSME Performance - RAMP) कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ () तर्फे २७ जून, २०२६ रोजी वाशी येथील सिडको कन्व्हेन्शन सेंटरमध्ये एमएसएमई शिखर परिषद व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत राज्यभरातील सुमारे ३ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजक आणि प्रतिनिधी सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या या शिखर परिषदेचा उद्देश उद्योग क्षेत्रातील अग्रणी व्यक्ती, तज्ज्ञ, धोरणकर्ते तसेच एमएसएमई क्षेत्रातील प्रतिनिधींना एकत्र आणून उद्योगवृद्धी, सहकार्य, नवकल्पना, शाश्वतता आणि जागतिक बाजारपेठेतील संधी यांवर सखोल चर्चा घडवून आणणे हा आहे. या परिषदेदरम्यान रॅम्प उपक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करून व्यवसायात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या सूक्ष्म व लघुउद्योगांना विशेष एमएसएमई पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. उत्पादन क्षमता, नवोन्मेष, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शाश्वत विकास आणि उद्योगातील उत्कृष्ट कामगिरी या निकषांच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची निवड केली जाणार आहे.

एमएसएमई शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उद्योजकांनी https://mahamsmeawards.in/summitया संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी. नोंदणी केल्यानंतरच परिषदेत सहभाग निश्चित मानला जाणार आहे. तसेच पात्र सूक्ष्म व लघुउद्योगांनी https://mahamsmeawards.in या संकेतस्थळावर एमएसएमई पुरस्कारांसाठी नामांकन () सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील विविध क्षेत्रांतील एकूण आठ श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

पुरस्कारांसाठी पात्रता

एमएसएमई पुरस्कारांसाठी *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.